**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** अरमोरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0262 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/08/2023 15:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 09/08/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/08/2023
**Time From (वेळेपासून):** 13:59 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 23:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/08/2023 **Time (वेळ):** 14:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/08/2023 15:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेशन, पोलीस स्टेशन,आरमोरी,आरमोरी, 441208

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. राहुल दशरथ माकडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिवणी ,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिवणी ,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): कष्टकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रकाश हनुमंत जाधव | | | 1. पोलीस स्टेशन ,पोलीस स्टेशन आरमोरी,आरमोरी,अरमोरी, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-441208 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | संगणकाचे सुटे भाग | सन्डीक्स कंपनीची 32 जीबी मेमरी कार्ड | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

0.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 11/08/2023

नांव:- राहूल दशरथ माकडे, वय 25 वर्षे, धंदा-मजुरी रा. मु. पो. शिवणी ता. आरमोरी जि. गडचिरोली
मी आज दिनांक 11/08/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथे हजर येवून माझी फिर्याद देतो की, दिनांक 09/08/2023 रोजी मी श्री श्रीधर पांडुरंग भोसले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांना जाधव मेजर पोलीस ठाणे आरमोरी यांचे विरुध्द मला 5000/- ढबू (पैसे) लाच मागितल्याची माझे सहीनिशी लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथे आज दिनांक 09/08/2023 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहत असून मजुरीचे काम करतो. दिनांक 06/10/2022 रोजी मी सकाळी 06.00 वाजता मोटार सायकलने कामाकरीता आरमोरीला गेलो होतो. माझा दोस्तबी मोरु ठाकरे सोबत होता. 09.00 वाजताचे दरम्यान आम्ही दोघेबी आरमोरी येथून घराकडे शिवणीला वापस निघलो. त्यावेळी डोंगरी जवळ माझे मोटार सायकलची आमचेच गावातील चरणदास दोनाडकर यांचे मोटार सायकलला ठोस लागली. यामध्ये आम्हा दोघांनाबी मार लागल्याने दवाखान्यात नेले. दवाखान्यात दवापाणी करून त्याच दिवशी माझे घरी गेलो. त्यानंतर तीन चार दिवसांनी आरमोरी पोलीस ठाण्यातील जाधव मेजर, यांनी मला आरमोरी पोलीस ठाण्यात बोलावून घेतले त्यावेळी मला माझेवर अँक्सीडेन्टच्या गुन्हा दाखल झाल्याचे कळले. गुन्हयाचा नंबर 408/2022 असा असल्याचे तसेच गुन्ह्याची कलम 279, 337 असल्याचे मले जाधव मेजरने सांगितले. मात्र मले अटक केली नाही नंतर बोलावतो असे सांगुन त्याच दिवशी सोडून दिले. यानंतर काल दि. 08/08/2023 रोजी 07.30 वाजताचे दरम्यान माझे गावातील प्रल्हाद राऊत हे माझे घरी आले व मले सांगितले की,'' आरमोरी पोलीस ठाण्यातील जाधव मेजर यांचा फोन आला होता, त्यांनी तुले आजच ताबडतोब पोलीस स्टेशन आरमोरी येथे बोलाविले आहे. यावर मी राऊत यांना विचारले की कशासाठी बोलाविले तेव्हा ते मला म्हणाले की, मागच्या वर्षीच्या अँक्सीडेंटच्या केसमध्ये बोलाविले आहे. म्हणून मी लगेच माझे मोटार सायकलने माझा दोस्त रोहित मुळे सोबत सकाळी 09.00 वा. दरम्यान आरमोरी पोलीस ठाण्यात जाऊन श्री. जाधव मेजर यांना भेटलो व मले कायच्यासाठी बोलाविले ते विचारले. तेव्हा त्यांनी ''मले तुझ्यावर दाखल असलेल्या अपघाताचे गुन्हयात तुझी मोटार सायकल जप्त करणार नाही व अटक करुन जेलमध्ये पाठवणार नाही तसेच तपासात तुला मदत करीन त्याकरीता मला ढबु दयावे लागेल'' असे म्हटले. आमचेकडे बोली भाषेत पैशाला ढबू पण म्हणतात. यावर मी त्यांना किती ढबू लागेल असे विचारले असता जाधव मेजर यांनी 5000/- ढबु आणुन दे, जर तु मला 5000/- ढबु दिले नाही, तर मी तुझी मोटारसायकल जप्त करीन व तपासात तुला मदत करणार नाही, असे म्हणाल्याने, मी घाबरून ठिक आहे, ढबुची व्यवस्था करून आपणास येवुन भेटतो असे म्हटले. तेव्हा त्यांनी ठिक आहे पोलीस स्टेशन आरमोरी येथे उदया दिनांक 09/08/2023 रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत गुन्हयातील मोटारसायकल व 5000/- ढबू घेवून ये व येतांना एकटेच यायचे कुणालाही सोबत आणायचे नाही तसेच ढबू मागितले म्हणून कोणालाही सांगायचे नाही. नाहीतर तुला अटक करुन सरळ जेलमध्ये टाकील अशी धमकी देवून मला पैशाची मागणी केली. माझा दोस्त रोहित मुळे सोबत असल्याने त्याने पण माझे व जाधव मेजर मध्ये झालेले बोलणे ऐकलेले आहे. जाधव मेजरचे पूर्ण नांव मला माहित नाही पण त्यांच्या खाकी ड्रेस चे उजव्या खिशावर नावाची पट्टी लावली होती त्यावर प्रकाश जाधव नापोशि ब.नं. 2872 असे लिहीले होते. श्री. जाधव मेजर, आरमोरी पोलीस ठाणे यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नसुन यापूर्वी त्यांची व माझी आर्थिक देवाण-घेवाण झालेली नाही. परंतु मला जाधव मेजर यांना लाच रक्कम 5000/- रुपये देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. यानंतर श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी दिनांक 09/08/2023 रोजी दोन शासकिय पंचांना पाचारण करुन त्यांची व माझी ओळख करून दिली. श्री. श्रीधर भोसले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या स्वहस्ताक्षरात दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिले. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक

श्री. श्रीधर भोसले यांनी सुद्धा स्वाक्षरी केली. पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांचे सुचनेवरून पो. शि. संदीप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. तसेच दोन्ही पंचांसमक्ष माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडती यादीवर माझी व दोन्ही पंचांची सही घेतली. यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडीक्स कंपनीची 32 जीबी सिरीयल क्रं. 2515TX2Q6082 चे नवीन मेमरी कार्ड टाकुन, वेळ 13:59 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु केल्यावर पंच क्र. 1 श्री विनायक मेश्राम यांच्या आवाजात त्यांचे नाव व दिनांकासह संभाषण रेकॉर्ड केले. यानंतर चालु स्थितीतील व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये दोऱ्याला चिमट्याने लटकवून जाधव मेजर यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता आरमोरी पोलीस ठाण्यात जाण्याकरीता माझे मोटार सायकलवर पंच क्र. 1 यांना बसवून रवाना केले. आरमोरी पोलीस ठाण्यात गेल्यावर मी ठाण्यात उभ्या असलेल्या खाकी ड्रेस घातलेल्या पोलीस वाल्याला जाधव मेजर आहेत काय असे विचारले असता त्याने एका रुमकडे बोट दाखवून जाधव मेजर इकडे बसतात, ताला मारुन आहे असे सांगितले. यावर मी त्यांना जाधव मेजरला फोन लावून दया बर असे म्हटले असता, त्यांनी मलाच फोन लाव असे म्हटले. यावर मी त्यांना माझेकडे फोन नाही आहे असे सांगितले असता त्यांनी जाधव मेजर बंदोबस्ताला गेले असतील, 5 वाजता या असे सांगितले परंतु मी तेथेच थांबुन राहीलो. यानंतर सुमारे 10 ते 15 मीनीटांनी एका पोलीसाने मला जाधव मेजर आल्याचे सांगितले म्हणून मी पाहीले तेव्हा मला जाधव मेजर दिसले असतांनी त्यांचेकडे गेलो, तेव्हा त्यांनी मला मोठया आवाजात एकटाच आलास का? असे विचारले. तेव्हा मी हो म्हटले. यावर त्यांनी पुन्हा मला ''एकदा कुणाले सोबत आणला होस'' असे विचारले असता मी ''कुणाले आणोजी सोबत'' असे म्हणून नाही आणले असे दर्शविले. यानंतर जाधव मेजर यांनी मला ''गाडी कोठी आहे'' असे विचारले असता मी त्यांना गाडी लावल्याचे ठिकाण दाखवीले. यानंतर मी त्यांनी ईशारा केल्यावर माझी मोटार सायकल पोलीस स्टेशनचे आंत आणली. यानंतर जाधव मेजर यांनी मला माझे वडीलांबद्दल विचारपूस करुन त्यांच्या रुम मध्ये नेले. तेथे मला जाधव मेजर यांनी ''ढबू किती आणलास'' म्हणून विचारणा केली, तेव्हा मी ढबू नाही आणलो असे म्हटले. यावर जाधव मेजर यांनी ''पोलीस स्टेशनमध्ये बिना ढबूने काम होते का'' असे सांगितले असता मी आता पैसे नाही आणलो पैसे आणण्यासाठी अँडजस्टमेंट करतो, वेळेवर कोण देणार आहे असे म्हटले. यावर जाधव मेजर यांनी ''मला कलम वाढवा लागते'' असे म्हटले पण त्याचा अर्थ मला समजला नाही. यानंतर सुमारे अर्धा तास जाधव मेजर यांनी मला बसवून ठेवले व त्यांनी कोणता तरी फार्म काढला व मला कोणत्या भाषा येते, कोणते जन्म डाग आहे असे विचारुन फार्म मध्ये लिहू लागले व मला शर्ट काढायला सांगितले. मी सुरुवातीला शर्ट काढायला खुप आडेवेढे घेतले पण शेवटी जाधव मेजर यांनी मला खुप बोलुन स्वतः माझे शर्टाच्या बटणा काढल्या. त्यावेळी त्यांना माझे गळयात लावलेल्या दोरीला चिमट्याने अटकवलेला व्हॉईस रेकॉर्डर दिसला. जाधव मेजर यांनी तो हाताने वर केला व एकदम दचकून परत सोडून दिला. यानंतर मला थांबून राहायचा ईशारा करुन बस म्हणाले व स्वतः घाबरुन बडबडत रुमच्या बाहेर गेले. त्यावेळी माझे लक्षात आले की, जाधव मेजर यांना रेकॉर्डर बाबत समजले असून आता ते मला पैशाची मागणी करणार नाही. यानंतर सुमारे दीड पावनेदोन तासाने जाधव मेजर परत रुममध्ये आले परंतु त्यांना माझे जवळ व्हॉईस रेकॉर्डर आहे हे माहित झाल्याने त्यांनी माझेशी पैशासंबंधी बोलणी न करता समजदारीची जमानत बाबत बोलणी केली. माझे कोणी आरमोरीत ओळखीचे आहेत का हे पण विचारले. सुपूर्दनाम्यावर गाडी सोडण्याबाबतही बोलणी केली. यानंतर माझे शिवणी गावातील अतुल पत्रे नावाचे माणसाला फोन लावला व माझे वडीलांशी बोलणी करुन माझे वडीलांना बोलवून घेतले. वडील आल्यावर माझे वडीलांशी बोलणी केली कागदावर माझे वडिलांची सही करा किंवा आंगठा मारा असेही बोलले व माझी गाडी पोलीस स्टेशनला ठेवायला सांगुन मला घरी जावू दिले व माझे वडीलांना पोलीस ठाण्यातच थांबवून ठेवले. यानंतर मी पंच क्र. 1 सोबत श्री श्रीधर भोसले पोलीस निरीक्षक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आल्यावर पो. शि. संदीप घोरमोडे यांनी माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवुन असलेले सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात संभाषण करवून व्हॉईस रेकॉर्डर 17.42 वा. बंद करून ताब्यात घेतले. यानंतर आम्ही सर्व शासकीय वाहनाने कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे 18.45 वाजता परत आलो. कार्यालयात परत आल्यावर श्री श्रीधर भोसले साहेबांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर कार्यालयातील संगणकाला जोडले असता व्हॉईस रेकॉर्डर मधील सॅनडीस्क कंपनीचे 32 जीबी मेमोरी कार्डमध्ये फोल्डर क्रमांक 1 मध्ये फाईल क्र. 230809_001.MP3 तयार झाल्याचे दिसून आले. संगणकाला लावलेल्या स्पिकरवर भोसले साहेब व दोन्ही पंचांनी सदर फाईल मधील माझे व जाधव मेजर यांचेमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता मी दोन्ही पंचासमक्ष सांगितलेली हकीकत खरी असल्याचे दिसून आले. यानंतर दोन्ही पंचासमक्ष सदर कार्ड रिडर मधील सॅनडीक्स कंपनीची 32 जीबी सिरीयल क्रं. 2515TX2Q6082 चे मेमरी कार्ड बाहेर काढुन प्लॉस्टीक

पाऊच मध्ये ठेवून सदर पाऊच एका लिफाफ्यात ठेवले व लिफाफ्यावर थोडक्यात वर्णन लिहून लिफाफा चिटकवून बंद केला. सदर लिफाफ्यावर श्री श्रीधर भोसले पोलीस निरीक्षक व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर लिफाफा लाखेने सिलबंद केला. या संपूर्ण कारवाईबाबत श्री श्रीधर भोसले पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. यांनी दिनांक 09/08/2023 रोजी दोन्ही पंचासमक्ष सविस्तर पंचनामा तयार केलेला आहे व मला फिर्याद देण्याकरीता आज दिनांक 11/08/2023 रोजी बोलाविले. एकंदरीत जाधव मेजर आरमोरी पोलीस ठाणे यांनी दिनांक 09/08/2023 रोजी झालेल्या लाचेच्या पडताळणी कारवाई दरम्यान मला माझे विरुध्द दाखल अँक्टसीडेन्टचा गुन्हा नंबर 408/2022 गुन्हयाची कलम 279, 337 मध्ये माझी मोटार सायकल जप्त न करण्यासाठी व मला अटक करुन जेल मध्ये न पाठविता तपासात मदत करण्यासाठी 5000/- ढबु (पैसे) लाचेची मागणी केली. करीता माझी प्रकाश जाधव नापोशि ब.नं.2872 याचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
DILIP PATRUJI MUNGHATE
**Rank (**पद**):** SI (Sub-Inspector) **No.(**क्र.**):** POBN52490
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

FIR ची रीतसर प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Sandip Punja Mandli
**Rank(**पद**):** I (Inspector) ठाणे अंमलदार
**No.(**सं.**):** dgpspmm8902 पोलीस स्टेशन आरमोरी

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | मजबुत | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)